नवराष्ट्र

# मानसिक आरोग्य क्षेत्रातील प्रतिनिधींना प्रशिक्षण

## मुकुल माधव फाउंडेशनतर्फे प्रशिक्षण शिबिराचे आयोजन



**पुणे :** मुकुल माधव फाउंडेशन आणि फिनोलेक्स इंडस्ट्रीज यांच्यातर्फे तीन दिवसीय मानसोपचार प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. लंडनमधील 'कन्सर्न फॉर मेंटल हेल्थ'च्या टीमने मानसिक आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या प्रतिनिधींना मानसोपचाराचे प्रशिक्षण देण्यात आले. मॉडेल कॉलनीतील सिम्बायोसिस संस्थेत हे प्रशिक्षण शिबीर झाले. भारतीयांच्या चांगल्या मानसिक आरोग्यासाठी मुकुल माधव फाउंडेशन सहा वर्षांपासून हा कार्यक्रम राबवित आहे.

१ या शिबीरामध्ये प्राथमिक आरोग्यसेवा क्षेत्रात काम करणारे डॉक्टर्स, मानसोपचार तज्ज्ञ, परिचारिका, विशेष शिक्षक आणि या क्षेत्रात काम करणाऱ्या इतर कार्यकर्त्यांना वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनच्या निकषांनुसार प्रशिक्षण दिले जाते. आजवर ६५० पेक्षा जास्त प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षित करण्यात आले आहे.

२ प्रशिक्षणार्थींना वर्ल्ड सायकिॲट्रिक असोसिएशनतर्फे प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. लंडन येथून आलेल्या डॉ. गझला अफझल, मौडस्ली हॉस्पिटलच्या डॉ. मिलाविक, मानसोपचार तज्ज्ञ डॉ. रम्या मोहन, मानसोपचारतज्ज्ञ डॉ. विल्यम शनाहन, फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू प्रकाश छाब्रिया आदी उपस्थित होते.

डॉ. गझला अफजल म्हणाल्या, मानसिक आजारांबाबत प्रागतिक दृष्टिकोन असून, या उपचारांचे चांगल्या पद्धतीने वितरण होत आहे. परंतु, बालकांच्या मानसिक आजारांवर उपचार करणाऱ्या मानसोपचार तज्ज्ञांची भारतात मोठी कमतरता आहे. त्यामुळेच अशा कार्यक्रमांतून अद्ययावत प्रशिक्षण देणे आवश्यक वाटते.

यावेळी फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू प्रकाश छाब्रिया म्हणाल्या की, मानसिक आरोग्य क्षेत्रात कार्यरत नर्स, मानसोपचारतज्ज्ञ आणि इतर व्यावसायिकांसाठी हे प्रशिक्षण आहे. या भागीदारीमुळे लोकांमध्ये मानसिक आरोग्यविषयी जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली आहे. देशातील मानसिक आरोग्यसेवेत सुधारणा करण्यासाठी एक सामाजिक व्यासपीठ उभे करण्याचा विचार करीत आहोत. ससूनच्या सहकार्याने जिल्हा परिषद शाळांतील शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले होते. मानसिक आजाराची लक्षणे आढळल्यास जिल्हा रुग्णालयामार्फत औषधोपचार उपलब्ध करण्यात येत आहेत.

Pune Plus Edition
Feb 16, 2020 Page No. 4